# जिल्हा साहित्य संमेलनासाठी साहित्य संस्थांना मंडळाचे अनुदान

महाराष्ट्रात आयोजित करण्यात येणाऱ्या जिल्हा साहित्य संमेलनासाठी संस्था नोंदणी अधिनियम, १८६० आणि सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अंतर्गत नोंदणीकृत असणाऱ्या साहित्य संस्थांना सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी सहायक अनुदान देण्यासाठी पात्र संस्थांकडून दिनांक १ मे २०२६ ते ३१ मे २०२६ या विहित कालावधीत अर्ज मागविण्यात येत आहेत. विहित नमुन्यातील अर्ज व नियमावली शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर 'नवीन संदेश' या सदरात 'जिल्हा साहित्य संमेलनासाठी अनुदान' या शीर्षाखाली 'what's new' या सदरात 'Grant in Aid for Jilha Sahitya Sammelan' या शीर्षाखाली, तसेच महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या www.sahitya.marathi.gov.in या संकेतस्थळावर 'नवीनतम संदेश' या सदरात 'जिल्हा साहित्य संमेलनासाठी अनुदान' या शीर्षाखाली उपलब्ध होतील. तसेच सदर अर्ज महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार, सयानी मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५ (०२२ - २४३२ ५९३१) येथे वरील विहित कालावधीत शासकीय सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत उपलब्ध असतील. सदर अनुदानासाठीचे अर्ज विहित नमुन्यात व दि. १ मे २०२६ ते ३१ मे २०२६ या विहित कालावधीत महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडे शासकीय सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत सादर करणे बंधनकारक राहील. विहित कालमर्यादेनंतर (दिनांक १ मे २०२६ ते ३१ मे २०२६) येणाऱ्या अर्जाचा अनुदानासाठी विचार केला जाणार नाही.

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

जिल्हा साहित्य संमेलनाच्या अनुदानात वाढ करण्याबाबतचा शासन निर्णय अधिक्रमित करुन सुधारीत शासन निर्णय निर्गमित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**मराठी भाषा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः रासांधो-२०२३/प्र.क्र.४८/भाषा-३,**
नवीन प्रशासकीय इमारत, ८ वा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०६.०६.२०२५

वाचा :-१) मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्रमांक-रासांधो-१०१२/प्र.क्र.१२६/२०१२/ भाषा-३, दि.१७/०४/२०१५
२) मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्रमांक-रासांधो-२०२३/प्र.क्र.४८/ भाषा-३,दि.०३.१०.२०२४
३) सांस्कृतिक कार्य विभागाचे महाराष्ट राज्य सांस्कृतिक धोरण २०२४, दि.२३.०९.२०२४
४) अध्यक्ष,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई यांचे जा.क्र.सासंमं/प्रकाशने/ प्र.क्र.४३९/२०२४/३०४१, दि.१८.११.२०२४

<u>प्रस्तावना</u> :-

महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण, २०१० नुसार मुख्य मानल्या गेलेल्या प्रवाहापेक्षा वेगळया प्रवाहातील जनसमूहांच्या आणि उपेक्षित वर्गाच्या मराठी साहित्य संमेलनांनाही त्या त्या संमेलनाच्या एकंदर स्वरुपावर आधारित अनुदान देण्यासाठी मराठी भाषा विभाग संदर्भ क्र.१ येथील दिनांक १७/०४/२०१५ च्या शासन निर्णया अन्वये अन्य मराठी साहित्य संमेलन अनुदान ही योजना शासनाच्या वतीने राबविण्यात येत होती. त्यानुषंगाने दि.२६.०६.२०१९ च्या शासन निर्णयान्वये ३० साहित्य संस्थांकरिता प्रत्येकी रु. २ लक्ष प्रमाणे असे एकूण रु. ६० लक्ष इतके अनुदान मंजूर करण्यात आले. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने दि. २४.०३.२०२३ च्या बैठकीत अनुदानात रु.२ लक्ष वरुन रु.५ लक्ष इतकी वाढ करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला. त्यास अनुसरुन महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्हयाला प्रतिनिधीत्व मिळण्याच्यादृष्टीने व्याप्ती वाढविणे आवश्यक असल्याने ह्या संमेलनांना जिल्हा साहित्य संमेलन संबोधून जिल्हा साहित्य संमेलनाच्या अनुदानात रु.२ लक्ष वरुन रु.५ लक्ष इतकी वाढ करण्याबाबतचा संदर्भ क्र. २ येथील दि.०३.१०.२०२४ चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. दरम्यान “महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण २०२४,” संदर्भ क्र. ३ येथील दि.२३.०९.२०२४ च्या शासन निर्णया अन्वये जाहीर झाले असून त्यामधील मुद्दा क्र.१.२.२१ अन्वये एकाच साहित्य संमेलनांना भरघोस मदत करण्यापेक्षा विभागीय स्तरावर होणाऱ्या संमेलनांना आर्थिक मदत करावी असे नमूद केले आहे.

२. या योजनेची अंमलबजावणी साहित्य आणि संस्कृती मंडळामार्फत करण्यात येते. त्या दृष्टीने सदर शासन निर्णयात साहित्य आणि संस्कृती मंडळाने संदर्भ क्र. ४ येथील दि.१८.११.२०२४ रोजीच्या पत्रान्वये काही बदल सुचवलेले आहेत. मंडळाने दिलेल्या सूचना तसेच सांस्कृतिक धोरण २०२४ मधील मुद्दा क्र.१ .२.२१ विचारात घेऊन, संदर्भाधिन क्र.२ येथील दि.०३.१०.२०२४ चा शासन निर्णय अधिक्रमित करुन सुधारीत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय:-**

यापुर्वीचा क्रमांक-रासांधो-२०२३/प्र.क्र.४८/भाषा-३, दि.०३.१०.२०२४ चा शासन निर्णय अधिक्रमित करुन , महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण २०२४ मधील मुद्दा क्र.१.२.२१ अन्वये एकाच साहित्य संमेलनांना भरघोस मदत करण्यापेक्षा विभागीय स्तरावर होणाऱ्या संमेलनांना आर्थिक मदत करावी आणि त्यामुळे राज्याच्या विविध भागामध्ये राहणाऱ्या लेखक-वाचक आणि संबंधित सर्वांना व्यासपीठ मिळण्याची संधी उपलब्ध होईल. यास अनुसरुन महाराष्ट्रातील ३६ जिल्हयात जिल्हा साहित्य संमेलन ही योजना राबविण्यास व सदर प्रत्येक संमेलनास दरवर्षी प्रत्येकी रक्कम रु. ५.०० लक्ष प्रतिपूर्ती अनुदान मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. जिल्हा साहित्य संमेलन योजनेची उद्दीष्टे, व्याप्ती, कार्यपध्दती, अटी व शर्ती, निकष :-

**उद्दीष्ट -**

मराठी साहित्याचा प्रचार, प्रसार व संवर्धन यासाठी जिल्हा साहित्य संमेलनाचे आयोजन

**व्याप्ती -**

१. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हयात साहित्य संमेलनाचे आयोजन करणे.
२. मराठी भाषा वाङ:मयप्रकारानुसार साहित्य संमेलनाचे आयोजन करणे.
३. मराठी भाषा विविध क्षेत्रप्रवाहानुसार साहित्य संमेलनाचे आयोजन करणे.
४. मराठी भाषा व्यवसायक्षेत्रानुसार साहित्य संमेलनाचे आयोजन करणे. (उदा.वैद्यकीय क्षेत्र, आभियांत्रिकी इ.)
५. जिल्ह्यातील मराठी वृत्तपत्रे/नियतकालिकांचे संपादक,वार्ताहर, प्रतिनिधी तसेच जिल्ह्यातील ग्रंथालये, ग्रंथपाल, शाळा-महाविद्यालये ह्यातील मराठी विषयाच्या तसेच शालेय /महाविद्यालयीन ग्रंथालय, त्यामध्ये रस असणाऱ्या अध्यापकांना जिल्ह्यातील साहित्यिकांना सहभागी होण्यास प्रोत्साहन द्यावे.
६. शालेय आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना उपस्थितीसाठी विशेष प्रयत्न करावेत.

**मर्यादा :-** महिला,बाल आणि युवा साहित्य संमेलनांसाठी स्वतंत्रपणे योजना असल्याने त्यांचा व्याप्तीमध्ये समावेश नाही.

वरीलप्रमाणे संस्थांकडून प्राप्त होणाऱ्या अर्जांचा अनुदानासाठी विचार करण्यात येईल. तसेच याव्यतिरिक्त नाविन्यपूर्ण प्रस्ताव आल्यास साहित्य आणि संस्कृती मंडळाचा निर्णय अंतिम राहील.

**कार्यपध्दती -**

१) महाराष्ट्रात आयोजित करण्यात येणाऱ्या जिल्हा साहित्य संमेलनांना अर्थसहाय्य देण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने, दरवर्षी माहे एप्रिल अखेर वृत्तपत्रात जाहिरात देऊन १ मे ते ३१ मे या दरम्यान अर्ज मागवावेत व विहित कालमर्यादेनंतर (१ मे ते ३१ मे) येणाऱ्या अर्जाचा अनुदानासाठी विचार केला जाणार नाही, याचा स्पष्ट उल्लेख जाहिरातीत करावा. विहित कालमर्यादा जास्तीत जास्त १५ दिवसांपर्यंत वाढविण्याचा अधिकार महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास असेल.

२) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ कार्यालयाने विहित कालावधीत प्राप्त झालेले सर्व अर्ज मंडळाच्या बैठकीत सर्व सदस्यांसमोर अंतिम निवड करण्यासाठी सादर करावेत व मंडळ सदस्यांनी सर्वानुमते शासन नियमावलीतील सर्व अटींची पूर्तता करणाऱ्या संस्थेस जिल्हा साहित्य संमेलनांकरीता पात्र ठरवावे. सदर कार्यवाही माहे ३० जुनपर्यंत पुर्ण करावी.

३) निवड झालेल्या संस्थेने जिल्हा साहित्य संमेलन माहे जुलै ते डिसेंबर या कालावधीत आयोजित करणे आवश्यक आहे.

४) जिल्हा साहित्य संमेलन पारपडल्यानंतर सदर संस्थेने त्यांचा हिशोब महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास जानेवारी अखेरपर्यंत सादर करावा.

५) शासनाच्या प्रचलित धोरणानुसार, संमेलन पार पडल्यानंतर त्याबाबतचा संमेलन अहवाल, उपयोगिता प्रमाणपत्र, सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षक अहवाल ( ऑडिट रिपोर्ट ) सादर झाल्यानंतरच रु.५ लक्ष इतके अनुदान वितरीत करण्यात यावे.

**अटी व शर्ती:-**

१)

अ) ह्या संमेलनासाठी संबंधित जिल्ह्यातील अथवा लगतच्या जिल्ह्यातील लेखक, कलावंत, वक्ते हयांना कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी निमंत्रित करावे. रसिक वाचकांसाठी अर्थातच असे कोणतेही भौगोलिक बंधन नाही.

ब) जिल्हा साहित्य संमेलनाच्या अनुषंगाने आयोजन करताना शासन अनुदानाचा खर्च मराठी भाषा प्रचार प्रसार जतन व संवर्धन याअनुषंगाने कार्यक्रम/चर्चा/परिसंवाद याकरिता करण्यात यावा. संमेलनातील सहभागी लेखक, वक्ते यांचे मानधन, प्रवास खर्च शासन अनुदानातुन संस्थेने करावा.

क) संमेलनात सहभागी व्यक्तींचे मानधन, खानपान व्यवस्था, हॉल/मंडपचे भाडे, ध्वनि व्यवस्था, फोटोग्राफी व व्हिडीओ शुटींग, वृत्तपत्र जाहिरात छापील माध्यमातील प्रचार-प्रसारावरील खर्च शासन अनुदान करण्यात यावा.

२) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या सदस्यांना तसेच मराठी भाषा विभागाने प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधींना सदर संमेलनात निमंत्रित करण्यात यावे.

३) निवड झालेल्या संस्थेने संमेलनासंदर्भातील सर्व प्रसिध्दीपत्रकांवर शासन अनुदानाचा उल्लेख करावा तसेच मराठी भाषा विभाग व महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे नाव व बोधचिन्ह छापण्यात यावे.

४) संमेलनात मराठी भाषा विभाग व विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयांचा माहितपट दाखविण्यात यावा.

५) निवड झालेल्या संस्थांनी शासन अनुदानातून संमेलनाची स्मरणिका प्रकाशित करावी. त्याव्दारे संमेलनातील चर्चा, परिसंवाद, भाषणे ह्यांचे दस्तऐवजीकरण करावे..

६) निवड झालेल्या संस्थांनी संमेलनात मराठी भाषा विभाग व विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयातील प्रकाशित पुस्तकांचा स्टॉल लावण्यासाठी शासकीय मुद्रणालयाशी संपर्क साधावा. तसेच स्थानिक प्रकाशकांना म्हणजे त्या जिल्ह्यात मुख्यालय असलेले प्रकाशकांना देखील प्राधान्य देऊन त्यांना विनामूल्य पुस्तकांचे स्टॉल उपलब्ध करुन देण्यात यावेत.

७) निवड झालेल्या संस्थांनी त्यांच्याकडून आयोजीत करण्यात येणाऱ्या संमेलनामध्ये युवकांचा सहभाग अधिकाधिक प्रमाणात राहील याची दक्षता घ्यावी.

**निकष :-**

१) महाराष्ट्र शासनाकडून अर्थसहाय्य मिळण्याच्या अनुषंगाने अर्जदार साहित्य संस्थांनी अर्ज परस्पर शासनास सादर न करता, सोबतच्या **परिशिष्ट-अ** मधील विहित नमुन्यात व विहित

कालावधीत महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या पत्त्यावर पोस्टाने अथवा समक्ष सादर करणे बंधनकारक राहील. ( पत्ता: सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाट्य मंदिर इमारत, दुसरा मजला, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार, सयानी मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०००२५ )

२) अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रांची यादी (परिशिष्ट-अ नुसार)

३) सदर योजनेची जाहिरात प्रसिद्ध होण्यापूर्वी संपन्न झालेल्या जिल्हा साहित्य संमेलनाच्या अनुदानासाठी संस्थेस अर्ज करता येणार नाही, तर सदर योजनेत अर्ज सादर करावयाच्या विहित कालावधीनंतर त्या-त्या वित्तीय वर्षात माहे जुलै ते माहे डिसेंबर या कालावधीत आयोजित करावयाच्या जिल्हा साहित्य संमेलनाच्या अनुदानासाठी संस्थेस अर्ज करता येईल. संस्थेकडून आयोजित करण्यात येणाऱ्या साहित्य संमेलनाचे नाव, दिनांक व स्थळ, कितवे संमेलन आहे हा तपशील सदर अर्जात नमूद करणे बंधनकारक राहील. सदर माहिती अर्जात नमूद केली नसेल किंवा अर्ज अर्धवट भरलेला असेल तर तो अर्ज अपात्र ठरविण्यात येतील.

४) एकाच संस्थेला दोन वेगवेगळ्या जिल्ह्यांसाठी अर्ज सादर करता येणार नाही. या योजनेअंतर्गत जिल्हा साहित्य संमेलनाच्या अनुदानासाठी एक संस्था एकावेळी एकच अर्ज करू शकेल. एका संस्थेला एका वेळी दोन किंवा त्यापेक्षा अधिक अर्ज सादर करता येऊ शकणार नाहीत. एकावेळी एका संस्थेचे एकापेक्षा अधिक अर्ज प्राप्त झाल्यास सदर संस्थेचे सर्व अर्ज अपात्र ठरविण्यात येतील.

५) अर्जदार संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० आणि सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अश्या दोन्ही कायद्यांतर्गत धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असाव्यात. मालकी हक्काने चालविण्यात येणाऱ्या संस्था अनुदानास पात्र असणार नाहीत. संस्था नोंदणी अधिनियम १८६० व १९५० अंतर्गत दोन्ही नोंदणी प्रमाणपत्रे अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील. तसेच अर्जदार संस्था महाराष्ट्रातील ज्या जिल्ह्यात वरील नोंदणी अधिनियामानूसार नोंदणीकृत असेल, त्याच जिल्ह्यात जिल्हा संमेलन आयोजित करणे त्या संस्थेस बंधनकारक राहिल.

६) अनुदानासाठी अर्ज करणारी साहित्य संस्था किमान ५ वर्षे साहित्य क्षेत्रामध्ये कार्यरत असणे आवश्यक आहे. अर्जदार साहित्य संस्थांनी अर्जासोबत अर्जाच्या दिनांकापूर्वीच्या पाच वर्षांच्या साहित्यविषयक उपक्रमांच्या कामाचा अहवाल जोडणे आवश्यक राहील.

७) अर्जदार साहित्य संस्थांनी अर्जासोबत अर्जाच्या दिनांकापूर्वीच्या मागील किमान ३ वर्षांचे सनदी लेखापालाने (Chartered Accountant ) लेखापरिक्षित केलेले लेखा अहवाल महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडे सादर करणे आवश्यक राहील. सनदी लेखापाल अर्जदार संस्थेचा / संमेलनाचा सदस्य नसावा.

८) शासनाने दिलेल्या निधीचा उपयोग जिल्हा साहित्य संमेलनांसाठीच करण्यात येणार असल्याचे प्रमाणपत्र सोबतच्या विहित नमुन्यातील परिशिष्ट-ब मध्ये देणे अर्जदार संस्थेस बंधनकारक राहील. (**परिशिष्ट-ब सोबत जोडले आहे**.)

९) अर्जदार संस्थेने आपले संमेलन आयोजनासंदर्भातील संमेलनविषय व एकूणच ध्येय धोरण एकदा स्पष्ट केल्यानंतर व यासंदर्भातील अनुदानासाठीचा प्रस्ताव सादर केल्यावर त्यामध्ये कोणताही बदल करता येणार नाही. अथवा कोणतीही भर घालता येणार नाही.

१०) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे मंजूर होणारे अनुदान फक्त त्या एका संबंधित आर्थिक वर्षासाठी असेल व जिल्हा साहित्य संमेलनासाठी मंजूर केलेले अनुदान अर्जदार संस्थेस अन्य प्रयोजनासाठी

खर्च करता येणार नाही व यासंदर्भातील अनुदानाचे उपरोक्त सर्वसाधारण नियम व अटी संस्थांना लागू होतील. सदर योजनेअंतर्गत शासनाकडून ज्या संस्थेला संमेलनासाठी एकदा अनुदान दिले जाईल, त्या संस्थेला पुढील ३ वर्षे संमेलनासाठी अनुदान दिले जाणार नाही.

११) अर्जदार संस्थेने, संस्थेस मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाचे उपयोजन प्रमाणपत्र, संमेलन अहवाल व शासनाने दिलेल्या अनुदानाचा लेखापालांनी लेखापरिक्षित केलेल्या खर्चाचा अहवाल (ऑडिट रिपोर्ट) ३ महिन्याच्या आत महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास सादर करणे अर्जदार संस्थेस बंधनकारक राहील.

१२) अर्जदार संस्थेकडील अर्थसहाय्यबाबतची सर्व कागदपत्रे व हिशोब महालेखापाल, महाराष्ट्र-१,मुंबई किंवा त्यांचे अधिकारी तसेच मराठी भाषा विभागाचे अधिकारी यांना तपासण्याचा अधिकार असून त्यांनी मागणी केल्यास सर्व कागदपत्रे त्यांच्याकडे तपासणीसाठी सादर करणे आवश्यक राहील.

१३) वरील कार्यपध्दतीतील मुद्दा क्र.२ मधील नमूद कार्यपध्दतीनुसार वरील निकषांच्या आधारे अर्जदार संस्थांची निवड करण्यासंदर्भातील वाङ्मयीन धोरणात्मक निर्णय घेण्याचे अंतिम अधिकार महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष व सदस्य यांना असतील.

३. सदर योजनेचा प्रचार, प्रसार व प्रसिध्दी होण्याच्या दृष्टीने, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने माहे एप्रिल अखेर योग्य कालावधीसह वृत्तपत्रात जाहिरात देवून सर्वतोपरी प्रयत्न करावेत. ( अर्जाचा नमुना सोबतच्या परिशिष्ट-अ प्रमाणे )

४. सदर योजनेची अंमलबजावणी सन २०२५ -२६ या आर्थिक वर्षापासून करण्यात येईल. या योजनेअंतर्गत होणारा खर्च "मागणी क्रमांक झेडएफ-०२, मुख्य लेखाशीर्ष -२२०५ -कला व संस्कृती, ०२- योजनांतर्गत योजना, (०२) (०१)- राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, (२२०५ ३२१४) ३१- सहायक अनुदाने (वेतनेत्तर) या लेखाशिर्षाखाली उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

५. यासाठी सहायक लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या त्यांच्या अधिपत्याखालील दुय्यम अधिकाऱ्यास या संबंधिच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. ४०९- अ/१४४३, दि.०७.०८.२०२४ व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ४९७/व्यय-४, दि. २१.०८.२०२४ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०२५०६०६१३०१२६६५३३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NITIN JOTIRAM DANGARE

Digitally signed by NITIN JOTIRAM DANGARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MARATHI LANGUAGE DEPARTMENT, 2.5.4.20=2199314143adc352dccd62da8d57c0c437f1857f98da7b40525225bbbd5b59e9, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=EF4BF635C99B4893102C08CC8CC543C45250E19DC2A7932C127A2E60D75F7904, cn=NITIN JOTIRAM DANGARE
Date: 2025.06.06 13:02:47 +05'30'

**( नितिन जो. डंगारे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,

३. मा.मंत्री (मराठी भाषा) यांचे खाजगी सचिव / विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
४. मा.राज्यमंत्री (मराठी भाषा) यांचे खाजगी सचिव / विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
५. मा.सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
६. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
७. मा.समिती प्रमुख व सदस्य, मराठी भाषा समिती, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई,
८. मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
९. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई,
१०.प्रबंधक, लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त कार्यालय, मुंबई,
११.महालेखापाल, महाराष्ट्र-१ /२ (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर,
१२.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१३.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१४.वित्त विभाग (व्यय-४/अर्थसंकल्प-१४) मंत्रालय, मुंबई,
१५.अपर मुख्य सचिव (मराठी भाषा विभाग) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
१६.संचालक (माहिती व वृत्त) , माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
१७.अध्यक्ष / सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
१८.सर्व अवर सचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१९. भाषा - ३ (संग्रहार्थ)**

**परिशिष्ट- अ**

शासन निर्णय क्रमांकः रासांधो-२०२३/प्र.क्र.४८/भाषा-३, दि.०६/०६/२०२५

जिल्हा साहित्य संमेलनाकरीता संस्थेने अनुदानार्थ करावयाचा अर्ज

| | | |
|---|---|---|
| १ | संस्थेचे नाव व पत्ता | |
| २ | संस्थेचा नोंदणी क्रमांक व दिनांक ( नोंदणी प्रमाणपत्रे सोबत सादर करावीत ) | |
| ३ | संस्थेचे स्वरुप, कार्यक्षेत्र व उद्देश | |
| ४ | ठराव | |
| ५ | संस्थेचे कार्यकारी मंडळ आहे काय ? असल्यास, कार्यकारिणीच्या सदस्यांची नांवे व पत्ता | |
| ६ | संस्थेतर्फे शासकीय / निमशासकीय उपक्रम राबविण्यात आले आहेत काय? असल्यास, संस्थेने राबविलेल्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती द्यावी | |
| ७ | संस्थेस यापूर्वी शासकीय / निमशासकीय किंवा खाजगी अनुदान / अर्थसहाय्य प्राप्त झाले होते काय ? असल्यास, किती व कोणातर्फे ? | |
| ८ | सनदी लेखापालाकडून संस्थेचे लेखा परिक्षण करुन घेतलेले आहे काय? असल्यास, मागील तीन वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालाची प्रत सादर करावी | |
| ९ | संस्थेने शासनाच्या अटी व शर्तीची पूर्तता केली आहे काय ? असल्यास, किती अटी व शर्तीची पूर्तता केली आहे ? | |
| १० | संस्थेची इमारत स्वतःच्या मालकीची आहे वा भाडयाची आहे याबाबतची सविस्तर कागदपत्रे जोडावीत | |
| ११ | प्रस्तावित जिल्हा साहित्य संमेलनाचे नाव (विषय) | |
| १२ | प्रस्तावित जिल्हा साहित्य संमेलनाचे स्थळ व संमेलनाचा दिनांक | |
| १३ | प्रस्तावित जिल्हा साहित्य संमेलन कितवे आहे | |
| १४ | संस्था अनुदानास पात्र ठरल्यास ई-कुबेर प्रणालीद्वारे संस्थेस अनुदान वितरीत करण्यासाठी संस्थेच्या बँक खात्याच्या धनादेशाची मूळ प्रत, संस्थेच्या पॅनकार्डच्या स्वसाक्षांकित केलेल्या दोन छायांकित प्रती, संस्थेच्या बँक खात्याच्या चेकबुकच्या किंवा पासबुकच्या पहिल्या पृष्ठाच्या स्वसाक्षांकित केलेल्या दोन छायांकित प्रती अर्जासोबत सादर कराव्यात. | |

**जोडलेल्या कागदपत्रांची यादी** :- संस्था नोंदणी प्रमाणपत्र, घटनेची प्रत, यापुर्वी घेतलेल्या साहित्यिक उपक्रमांचे अहवाल व वृत्तपत्रे कात्रणे, ३ वर्षाचे ऑडिट रिपोर्ट

प्रमाणित करण्यात येते की, संस्थेतर्फे देण्यात आलेली वरील सर्व माहिती सत्य आहे. सदर माहिती खोटी किंवा चुकीची असल्याचे आढळून आल्यास, संस्था शासन नियमानुसार कार्यवाहीस अपात्र ठरविण्यात यावी व सदरहू संस्थेस कोणत्याही प्रकारचे अनुदान / अर्थसहाय्य देऊ नये किंवा यापुढेही देण्यात येऊ नये.

आपला

दिनांक :

ठिकाण : ( )

अध्यक्ष/सचिव

**परिशिष्ट- ब**

शासन निर्णय क्रमांकः रासांधो-**२०२३**/प्र.क्र.४८/भाषा-**३**,दि.०६/०६/२०२५

जिल्हा साहित्य संमेलनाच्या आयोजनासाठी शासनाकडून मिळणाऱ्या निधीचा उपयोग हा केवळ जिल्हा साहित्य संमेलनाच्या आयोजनासाठी करण्यात येईल. या निधीचा उपयोग जिल्हा मराठी साहित्य संमेलनाच्या आयोजनाशिवाय अन्य कोणत्याही कारणासाठी केला जाणार नाही. तसेच मराठी भाषा विभागाच्या जिल्हा साहित्य संमेलनाच्या शासन निर्णयात नमूद सर्व अटी, शर्ती व निकाषांचे काटेकोरपणे पालन करण्यात येईल.

पदनाम व स्वाक्षरी

“जनहितार्य सर्वदा”

**महाराष्ट्र शासन**
**मराठी भाषा विभाग**
नवीन प्रशासकीय भवन, वा मजला ८,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दूरध्वनी क्र ४१६९ २२७९-०२२ :

क्रमांक : रासांधो २०२३/प्र.क्र.४८/भाषा-३ दिनांक १६.०६.२०२५

प्रति,

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई.

विषय : जिल्हा साहित्य संमेलनासाठी अनुदान योजनेचे स्पष्टीकरण
संदर्भ : आपले दि.११.०६.२०२५ चे पत्र

उपरोक्त विषयाच्या संदर्भाधिन पत्रान्वये जिल्हा साहित्य संमेलनासाठी अनुदान योजनेच्या दि.०६.०६.२०२५ शासन निर्णयातील परि.२ मधील कार्यपध्दतीतील अनुक्रम ५ मध्ये खालीलप्रमाणे स्पष्टीकरण करण्यात येत आहे :-

“महाराष्ट्र राज्य साहित्य अणि संस्कृती मंडळाच्या बैठकीत प्राप्त सर्व अर्जामधून मंडळाच्या सदस्यांनी सर्वानुमते शासन नियमावलीतील सर्व अटींची पूर्तता करणाऱ्या ज्या संस्थेस जिल्हा साहित्य संमेलनासाठी पात्र ठरविण्यात येईल त्या संस्थेस संमेलन घेण्यासाठी संमेलना अगोदर शासनाच्या प्रचलीत धोरणानुसार प्रत्येकी रक्कम रुपये ५.०० लक्ष इतके अनुदान मंडळाने वितरीत करावे. संमेलनानंतर त्याबाबतचा संमेलन अहवाल उपयोगिता प्रमाणपत्र, सनदी लेखा परिक्षक अहवाल तात्काळ सादर करावा.विहीत कालावधीत उपरोक्त बाबी प्राप्त न झाल्यास संबंधित संस्थेला भविष्यात अनुदान देण्यात येणार नाही तसेच दिलेल्या अनुदानाच्या वसुलीबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.”

सदर स्पष्टीकरणानुसार योजनेची अंमलबजावणी व पुढील कार्यवाही करण्यात यावी.

(नितिन डंगारे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
कार्यासन संग्रहार्थ